पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**<u>कार्यपत्रिका क्रमांक ४३</u>**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ७/१/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **<u>स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. १९४६**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/१२/२०१९ ते दि.२५/१२/२०१९ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/४३९१ दि. २७/१२/२०१९ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १९४७**

मा.सौ.छाया मारणे व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.३१/१२/२०१९ चे पत्र.

पुणे शहरातील बहुतांशी जाहिरातफलक ४० फुटापेक्षा जास्त उंचीवर, वाहतूकीच्या रस्त्यापासून १.५ मीटर अंतराच्या आतमध्ये, नाले, नदीपात्र तसेच पदपथ व रस्त्यावर उभे केलेले आहेत. सदरील जाहिरात फलक जाहिरात नियमावली २००३ चे उल्लघंन व मे.उच्च न्यायालयाची आदेशाची पायमल्ली करीत आहेत. सदरील कायद्याचा अनादर करत असलेले जाहिरात फलक नागरिकांच्या जिविताच्या दृष्टीने धोकादायक आहेत. सदर बाब ज्ञात असूनही प्रशासकीय हलगर्जीपणा, निष्क्रियता, गलथाणपणामुळे कायद्याचा अनादर करीत असलेल्या धोकादायक जाहिरात फलकांवर प्रत्यक्षात कारवाई होताना दिसत नाही.

आकाशचिन्ह व परवाना विभागाने कारवाई करणेचे अधिकार क्षेत्रिय स्तरावर वर्ग केलेले आहेत. क्षेत्रिय कार्यालाकडून अनेक पायाभूत सुविधा व नागरिकांच्या तक्रारी तसेच अनेक कामांची जबाबदारी आहे. यामुळे क्षेत्रिय अधिकारी व परिमंडळ उप आयुक्त स्तरावरील अधिका-यांवर कामाचा ताण प्रचंड प्रमाणात असल्याने जाहिरात फलकाचे काम सांभाळणे, कारवाई, परवानगी इ.काम करणे अडचणीचे ठरत आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये जाहिरात फलकासाठी परवाना व आकाशचिन्ह हा स्वतंत्र विभाग आहे. असे असतानाही क्षेत्रिय स्तरावरून जाहिरात फलकाची कामे करणे अनाकलनीय आहे. सबब जाहिरात फलक संदर्भातील सर्व कामे परवाना व आकाशचिन्ह विभागामार्फत करून परवानगी व कारवाईचे सर्व अधिकार परवाना व आकाशचिन्ह विभागाचे प्रमुखांना देण्यात यावेत.

**विषय क्र. १९४८**

मा.सौ.सोनाली लांडगे यांचे दि.३१/१२/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.७ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, पान क्र. २६६, अ.क्र. ५२, प्रभाग क्र.७ अ मध्ये विविध ठिकाणी उद्यानांमध्ये सुशोभिकरण करणे | ३० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे</u> | | |
| १) प्रभाग क्र.७ अ मधील पाटील ईस्टेट गल्ली नं. ७ येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.७ अ मधील पाटील ईस्टेट गल्ली नं. ८ येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.७ अ मधील पाटील ईस्टेट गल्ली नं. २ येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १९४९**
मा.श्रीनाथ भिमाले यांचे दि.२/१/२०२० चे पत्र.

स्थायी समिती ठ.क्र. १९३८ दि. ३१/१२/२०१९ चा फेरविचार करुन मा.सभासदांचे मुळ प्रस्ताव दप्तरी दाखल करावा.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १९५०**

अन्न परवाना विभागाकडील नर्सिंग होम्स रजिस्टर्सची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१८६८ दि.२३/१२/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १७ सन २०१९-२०२० चा विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. १९५१**

पुणे शहरातील प्रभागांकरीता १४ क्यु.मी. क्षमतेचे कॉम्पॅक्टर स्पेसिफिकेशनप्रमाणे खरेदी करणे (बी - १ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. कॅम-अविदा एनव्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,२७,०१,२८८/- पेक्षा ३.८४% कमी) असल्याने त्यांचेकडून १ नग करीता रक्कम रु.३०,५३,१९४.०३ (अक्षरी र.रु. तीस लाख त्रेपन्न हजार एकशे चौऱ्याण्णव पैसे तीन फक्त) जीएसटी २८ % व वाहतुक, ट्रान्झिट इन्शुरन्स, सीआरटीएम इ. खर्चासह याप्रमाणे ४ नग कॉम्पॅक्टर करीता र.रु.१,२२,१२,७७६.१४ (अक्षरी र.रु.एक कोटी बावीस लाख बारा हजार सातशे छहात्तर पैसे चौदा फक्त) जीएसटी २८% व वाहतुक, ट्रान्झिट इन्शुरन्स, सीआरटीएम इ. खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९०८ दि.३१/१२/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १९५२**

चांदणी चौक येथील रस्ता रुंदीकरणातील अडथळा निर्माण करणाऱ्या एच.टी./एल.टी. ओव्हरहेड लाईन भुमिगत करणे (सुस विभाग) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मनुश्री इलेक्ट्रीकल्स् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.१,५८,७१,७६१=१९ पेक्षा १६% जास्त दराने) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,८४,११,२४२=९८ अधिक जी.एस.टी. १८% र.रुपये ३३,१४,०२३=७४ असे एकूण र.रुपये२,१७,२५,२६६=७२ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/९०९ दि.१/१/२०२० चे पत्र.

## टेंडर्स न मागविता ५(२)(२) अन्वये प्रकरणे

**विषय क्र. १९५३**

पुणे महानगरपालिकेच्या शासकीय कामाकाजासाठी करावयाची वाहन खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे. मारुती सुझूकी इंडिया लि. या उत्पादक कंपनीकडून DZIRE VXI, BS-VI या मॉडेलची कार गर्व्हनमेंट ई मार्केटपोर्टलवरील (GeM) दराप्रमाणे खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९०४ दि.३०/१२/२०१९ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेच्या शासकीय कामाकाजासाठी करावयाची वाहन खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे. मारुती सुझूकी इंडिया लि. या उत्पादक कंपनीकडून DZIRE VXI, BS-VI या मॉडेलची कार गर्व्हनमेंट ई मार्केटपोर्टलवरील (GeM) दर रक्कम रु.५,९२,२४०=७२ प्रती नग जीएसटी २८% व इतर सर्व करांसह अधिक वाहतुक खर्च रु.९=५० प्रती कि.मी. (उत्पादक कंपनी ते पुणे अंतर १४२२ कि.मी.) याप्रमाणे एकूण अंतरासाठी र.रु.१३,५०९/- अधिक जीएसटी २८% व इतर कर याप्रमाणे र.रु.१७,४२६=६१ याप्रमाणे १ नग कार करीता रक्कम रु.६,०९,६६७=३३ पर्यंत जीएसटी २८% व इतर कर, वाहतुक खर्चासह याप्रमाणे ११ कार करीता र.रु.६७,०६,३४०=६३ पर्यंत जीएसटी २८% व इतर कर, वाहतुक खर्चासह त्यांचे दरापत्रकातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस,

२) सदर कार खरेदी कामी होणारे देयक मे.मारुती सुझूकी इंडिया लि. यांचे नावे ऑनलाईन पध्दतीने ईसीएस/आरटीजीएस/एनईएफटी याद्वारे आदा करणेस...

३) पुणे महानगरपालिकेच्या शासकीय कामाकाजासाठी करावयाची वाहन खरेदी कामी येणारा खर्च खालील अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकामधून करणेस...

सन- २०१९-२०
एफ ई- १७ ए - १४६
७ यंत्रसामुग्री घसारा निधीतून विकत घ्यावयाची सामुग्री
मनपा अधिकारी/पदाधिकारी मोटारकार खरेदी करणे.
मान्य रक्कम रूपये- ७०,००,०००/-

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १९५४**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील हातगाडी वाल्यावंर कारवाई होते व त्यांना रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये अतिक्रमण कारवाईत जप्त हातगाडी सोडणेकरिता मान्य झालेले रिमुव्हल चार्जेस रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) रद्द करुन त्याऐवजी रुपये १,०००/- (रुपये एक हजार) रिमुव्हल चार्जेस आकारुन हातगाडया सोडणेबाबत मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.पल्लवी जावळे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.रत्नप्रभा जगताप, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सौ.दिपाली धुमाळ, मा.आबा बागुल, मा.सौ.हेमलता मगर, मा.सौ.सुमन पठारे, मा.वनराज आंदेकर, मा.अशोक कांबळे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.पुजा कोद्रे, मा.प्रिया गदादे, मा.अजित दरेकर यांचे दि. २०/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३१३ दि. ४/७/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/अतिक्रमण/१९५ दि.३/८/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९५५**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९५६**

सन २०१९-२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात CE22A680 ह्या अर्थशिर्षका अंतर्गत हज हाऊस बांधणे या कामाची र.रुपये ११७.५० लक्ष तरतूद प्रभाग क्र. २७ कोंढवा खुर्द स.नं. ४७/१ येथील पुणे मनपाच्या ताब्यात असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर हज हाऊसच्या कामासाठीची तरतूद त्याच जागेवर सिव्हीक कल्चरल ॲण्ड कम्युनिटी सेंटर बांधणे या सद्यस्थितीत चालू असलेल्या कामासाठी वापरणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/७३२ दि.१९/११/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९५७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३७६ मधील तरतूदीनुसार आरोग्य परवाने देताना परवाना फी विलंब फी, तडजोड फी व परवाना फॉर्म विक्रीचे दरात दि. ०१/०४/२०२० पासून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ ब क मधील तपशीलानुसार वाढ करून सुधारीत दराने आकारणी करणेसाठी खालील बाबीस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/एलएलओ/८०६ दि.७/१२/२०१९ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३७६ मधील तरतूदीनुसार आरोग्य खात्याकडील अन्न व परवाना विभागामार्फत आरोग्य परवाने देताना दि. ०१/०४/२०२० पासून परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेल्या तपशिलाप्रमाणे वाढ करून सुधारीत दराने तसेच यापुढे दर ३ वर्षांनंतर परवाना फी मध्ये ५% वाढ करून होणाऱ्या सुधारीत दराने आरोग्य परवाना फी ची आकारणी करणेस.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३७६ मधील तरतूदीनुसार आरोग्य खात्याकडील अन्न व परवाना विभागामार्फत लॉजिंग व्यवसायाकरिता आरोग्य परवाने देताना दि. ०१/०४/२०२० पासून परिशिष्ठ ब मध्ये नमूद केलेल्या तपशिलाप्रमाणे वाढ करून सुधारीत दराने तसेच यापुढे दर ३ वर्षांनंतर परवाना फी मध्ये ५% वाढ करून होणाऱ्या सुधारीत दराने आरोग्य परवाना फी ची आकारणी करणेस.

३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३७६ मधील तरतूदीनुसार आरोग्य खात्याकडील अन्न व परवाना विभागामार्फत आरोग्य परवाने देण्यासाठी असलेले विविध प्रकारचे विहित नमुन्यातील फॉर्म विक्रीचे दर दि.०१/०४/२०२० पासून परिशिष्ठ क मध्ये नमूद केलेल्या तपशिलाप्रमाणे वाढ करून सुधारीत दराने विक्री करणेस.

४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३७६ मधील तरतूदीनुसार आरोग्य खात्याकडील अन्न व परवाना विभागामार्फत ब्युटी पार्लर या व्यवसायाकरिता आरोग्य परवाने देताना दि. ०१/०४/२०२० पासून संबंधित व्यवसायधारक महिला ही विधवा अथवा निराधार असल्याचे कागदोपत्री पुरावे सादर करून व्यावसायिक दराने मिळकत कराची पावती सादर करणे ही अट शिथील करणेबाबतचा मागणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर महिला सक्षमीकरण करणेच्या उद्देशाने आरोग्य अधिकारी यांचे मान्यतेने सदर अट शिथील करून निवासी दराने मिळकत कर भरल्याची पावती सादर केल्यानंतर आरोग्य परवाना देणेस .

५) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील तरतुदीनुसार ब्युटीपार्लर या व्यवसायाकरिता आरोग्य खात्याकडील अन्न व परवाना विभागामार्फत आरोग्य परवाना न घेता निवासी /व्यावसायीक जागेमध्ये विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या व्यवसायधारकांना आळा घालणेकरिता धडाडीची शोध मोहीम राबवून सापडणाऱ्या व्यवसायधारकांकडून त्यांनी सदर व्यवसाय सुरु केल्याच्या दिनांकापासून प्रतिवर्षाची आरोग्य परवाना फी ची आकारणी व रक्कम रु. ५०००/- इतक्या दंडासह वसूल करून आरोग्य परवाने देणेची कार्यवाही करणेस.

६) परवाना फी व्यतीरिक्त परवाना धारकाकडुन नुतनीकरणाचे वेळी आकारण्यात येणारी व्यवसायनिहाय परिशिष्ट अ मध्ये नमुद व्यवसाय क्र. १ ते ८ व १० ते ११, तसेच परिशिष्ट ब मधील नमुद व्यवसायाकरीता विलंब फी, तडजोड फी ची आकारणी खालील प्रमाणे सुधारीत दराने करणेस.

| अ.क्र | परवाना नूतनीकरणासाठी अर्ज दाखल केल्याचा कालावधी | सध्याचा प्रचलित दर | | प्रस्तावीत दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | विलंब फी | तडजोड फी | विलंब फी | तडजोड फी |
| १ | दि. १ जानेवारी ते ३१ जानेवारी | ---- | ---- | ---- | ---- |
| २ | दि. १ फेब्रुवारी ते ३१ मार्च | ६/- | ---- | ३०/- | ---- |
| ३ | दि. १ एप्रिल ते ३० जून | ६/- | परवाना फीच्या २५% | ३०/- | परवाना फीच्या २५% |
| ४ | दि. १ जुलै ते ३० सप्टेंबर | ६/- | परवाना फीच्या ५०% | ३०/- | परवाना फीच्या ५०% |
| ५ | दि. १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर | ६/- | परवाना फीच्या १००% | ३०/- | परवाना फीच्या १००% |

७) नवीन आरोग्य परवाना देताना अर्जदाराने आर्थिक वर्षातील कोणत्याही महिन्यात अर्ज सादर केला असेल तरी त्यांचेकडुन त्या आर्थिक वर्षाची संपुर्ण परवाना फी आकारणी करणेस .व त्या आर्थिक वर्षाकरीता संबधीत अर्जदारांकडुन परवाना फी व्यतीरिक्त विलंब फी , तडजोड फी ची आकारणी न करणेस.

८) परिशिष्ट अ मधील नमुद क्र. १२ (मंगल कार्यालय/सभागृह) या व्यवसाय परवान्याचे नुतनीकरणाची फी मुदतीत न भरल्यास प्रतीवर्षीच्या परवाना फीची थकबाकी + प्रतिवर्षीची परवाना फी च्या १०% तडजोड फी+ एकवट विलंब फी रु. ३०/- अशी एकुण रक्कम वसुल करणेस.

९) कुत्रा बाळगणे परवाना फी आकारणी सुधारीत दराने प्रचलित पध्दतीनुसार करणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९५८**

पुणे मनपा प्रशासनाने शहरातील बहुतांशी जाहिरातफल्कांना चुकीच्या पद्धतीन परवानगी व नुतनीकरणे दिलेले आहे. सदर परवानगी व नुतनीकरण दिलेले जाहिरातफलक प्रत्यक्षात जागेवर रस्त्यापासून १.५ मी. अंतराच्या आतमध्ये, जमिनीपासून ४० फुटांपेक्षा अधिक उंचीवर, नाले व नदीपात्रात तसेच पदपथ व रस्त्यावर देखील उभे केलेले आहेत. सदरील जाहिरातफलक हे प्रचलित कायद्याचा अनादर करणारे असून नागरिकांच्या जीवाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहेत. सदर बाब संबंधित परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा. उपायुक्त, मा. क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना

निरिक्षक यांना ज्ञात असूनही प्रशासकीय निष्क्रियतेमुळे सदरील जाहिरातफलकांवर प्रत्यक्षात कारवाई होताना दिसत नाही. प्रशासनाने सदरील कायद्याचा अनादर करणा-या व धोकादायक जाहिरातफलकांवर १५ दिवसात कारवाई न केल्यास भविष्यात दुर्घटना घडून निष्पाप नागरिकांचा मृत्यु झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित जाहिरातदार, परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा.उपायुक्त, मा.क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरीक्षक यांचेवर निश्चित करण्यात यावी याबाबत मा.रफिक शेख व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. २६/७/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६३९ दि. ६/८/२०१९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/परवाना व आकाशचिन्ह/६३८ दि.१४/१०/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९५९**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९६०**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९६१**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९६२**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुक्तारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९६३**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९६४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९६५**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २४/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १९६६**

सन २०१९-२०२० चे मोटार वाहन विभागाकडील महसुली अंदाजपत्रकीय तरतुदीमधील अखर्चीत राहणाऱ्या तरतुदीमधून, आवश्यक असलेल्या व अपुऱ्या पडलेल्या महसुली अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर र.रुपये ३,२५,००,०००/- वर्ग करणेसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८९२ दि.२४/१२/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक, मोटार वाहन विभाग, ११-यांत्रिक | | |
| मा. पदाधिकारी यांना शासकीय वाहनाऐवजी वाहन प्रतीपूर्ती भत्ता RE 21 A 107 | ५ लाख | ---- |
| बी आर सी व अन्य कचरा विषयक वाहनांचे ऑपरेशन व मेंटेनन्स खाजगीकरणाने करणे. RE 21 C 127 | ४० लाख | ---- |
| विविध रॅम्पवरील कामकाज व कचरा वाहतूक खाजगीकरणाने करणे. RE 21 C 128 | ४० लाख | ---- |
| समाविष्ट गावांतील कचरा व्यवस्थापनासाठी वाहने व अनुषंगिक कामे करणे RE 21 C 142 | १०० लाख | ---- |
| पुणे शहरातील विविध तलावातील जलपर्णी यांत्रिक पद्धतीने आऊटसोर्सिंग तत्वावर काढणे RE 21 C 143 | १४० लाख | ---- |
| सुचविलेली कामे<br>मोटार वाहन विभाग, | | |
| २ - पेट्रोल, डिझेल, ऑईल व सिएनजी साठी खर्च, RE 21 A 103 | ---- | १०० लाख |
| ठेकेदारी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या मोटार सारथी/तांत्रिक सेवकांचे वेतन RE 21 C 104 B | ---- | १०० लाख |
| अपघात नुकसान भरपाई, RE 21 C 114 | ---- | १०० लाख |
| आरटीओ विषयक कामे करणे RE 21 C 117 | ---- | २५ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ३१/१२/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**संकीर्ण**

**विषय क्र. १९६७**

सहकारनगर येथील प्र.क्र.६७ ब कै.वि.स.खांडेकर शाळेमध्ये करावयाच्या विविध कामाबाबत ला.आर्किटेक्ट श्री.इनग्रेन,मुंबई यांनी शाळेचा विकास आराखडा तयार केलेला आहे.

सदर आराखड्यानुसार वि.स.खांडेकर शाळेमध्ये विकास कामे भवन रचना विभागामार्फत चालू आहेत.

सदर शाळेच्या आराखड्यामध्ये अस्तित्वात असणाऱ्या वॉचमन रूमच्या ठिक़ाणी रनिंग ट्रॅक व प्ले शेड दर्शविण्यात आलेले आहे. सदर अस्तित्वातील असणारी वॉचमन अंदाजे १२.० मी.लांब व ४.० मी.रूंद मापाची असून या वॉचमन रूमची उंची अंदाजे ३.६५ मी.आहे. अस्तित्वातील वॉचमन रूमच्या ठिकाणी रनिंग ट्रॅक व प्ले शेडचे काम करणेकरीता अस्तित्वातील वॉचमन रूमची पर्यायी व्यवस्था शाळेच्या उत्तरेकडील इमारतीच्या तळमजल्यावर करणे शक्य आहे.

तरी प्रभाग क्र.३५ क, कै.वि.स.खांडेकर शाळे मधील वॉचमन रूम पाडणेसाठी मान्यता मिळणेबाबत शिक्षण मंडळ विभागाकडील जा.क्र.४४८१,दि.२८/११/२०१६ रोजीचे पत्रावर मा.अति.महा. आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/७५० , दि.२५/११/२०१९ चे पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र. ८३ दि.२३/१२/२०१९ चा विचारासाठी.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)